# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 14.11.2025** **वार- शुक्रवार**

---

**नवले पूल अपघात**

पुण्यातील नवले पूल इथं झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. हा अपघात अत्यंत दुर्दैवी आहे. असा प्रकार पुन्हा घडू नये, यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांची अंमलबजावणी केली जाईल असं मोहोळ यावेळी म्हणाले. अल्पकालीन उपाययोजनांसंदर्भात उद्या संबंधित यंत्रणांसोबत बैठक घेतली जाईल. तसंच नऱ्हे ते रावेत व्हाया सुतारवाडी या उन्नत मार्गाचा विस्तृत प्रकल्प आराखडा मंजूर झाला असून त्याला गती देण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला जाईल,'अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

**मोहोळ प्रतिक्रिया**

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या स्पष्ट बहुमतावर प्रतिक्रिया देताना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी बिहारच्या जनतेचे आभार मानले. गेल्या पाच वर्षांत केंद्र आणि बिहारच्या 'डबल इंजिन' सरकारने राबवलेल्या विकासकामांवर जनतेने पुन्हा विश्वास व्यक्त केल्याचं ते म्हणाले.

**पुणे भाजपा निर्णय**

दरम्यान, काल नवले पुलाजवळ झालेल्या दुर्दैवी अपघातात अनेक नागरिकांचा बळी गेल्याच्या पार्श्वभूमीवर बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपने मिळवलेला ऐतिहासिक विजय साजरा न करण्याचा निर्णय पुणे भाजपने घेतला आहे.

**बालदिन**

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना पुण्यात विविध ठिकाणी अभिवादन करण्यात आलं. हा दिवस बालदिन म्हणूनही साजरा केला जातो. त्या निमित्तानं पुणे जिल्ह्यात आज मुलांसाठी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**बालहक्क संरक्षण**

बालकांच्या हक्काचे संरक्षण हे महिला आणि बालविकास विभागाचं आद्य कर्तव्य आहे, त्यादृष्टीनं बालकांच्या हक्कांचं आणि अधिकारांचं संरक्षण करुन पुरोगामी महाराष्ट्र अधिक मजबूत करुया, असं आवाहन महिला आणि बाल विकास आयुक्तालयाचे सह आयुक्त राहुल मोरे यांनी केले. बालदिनानिमित्त पुण्यात आयोजित बाल हक्क संरक्षण परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

गेल्या सहा महिन्यांत राष्ट्रीय बाल हक्क सरंक्षण आयोगाने विविध महत्त्वपूर्ण उपक्रम यशस्वीरीत्या राबवले आहेत. यामध्ये सुमारे 26 हजार बालहक्क उल्लंघन प्रकरणांची दखल घेवून त्यावर कार्यवाही करण्यात आली, अशी माहिती राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाच्या प्रतिनिधी रितू यादव यांनी यावेळी बोलताना दिली.

**बालदिन**

बालदिनानिमित्त आज पुणे महापालिकेच्या शिवाजीनगर येथील विशेष मुलांच्या शाळेत ग्लोबल ग्रुप आणि क्रिएटिव्ह फाउंडेशनतर्फे आनंदोत्सवाचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी, सामाजिक बांधिलकीची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजावी, या हेतूने , या शाळांमध्ये क्रीडा आणि कला साहित्य वितरित करण्यात आल्याची माहिती क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप खर्डेकर यांनी दिली.

**वाचनाअभावी मुलांमध्ये मुक-कर्णबधिरता**

पालकांनीच वाचन सोडल्यामुळे आणि दृकश्राव्य माध्यमांमुळे मुलांना पुस्तके वाचनाची आवड आणि गोष्टी ऐकण्याची सवय राहिलेली नाही. अशा मुलांमध्ये मुक-कर्णबधिरता वाढीस लागल्याचे जाणवत आहे. असं मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी व्यक्त केलं. लहान मुलांची कल्पनाशक्ती वाढीस लागण्याच्या दृष्टीनं, मुलांपर्यंत पुस्तके पोहोचविण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ते आज पुण्यात अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचा सुवर्णमहोत्सवी सांगता समारंभ आणि बालकुमार सुवर्णगाथा स्मरणिकेचा प्रकाशन समारंभात अध्यक्षपदावरून बोलत होते.

**बालमित्रांची अक्षरफुले**

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बालकुमार मराठी साहित्य संमेलन 2025 च्या निमित्ताने "बालमित्रांची अक्षरफुले" या अनोख्या कॉफीटेबल पुस्तकांचं प्रकाशन आज करण्यात आलं. पुणे जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कथा, लघुकथा, कविता यांचं संकलन करून हे पुस्तक तयार करण्यात आलं आहे.

**लहुजी वस्ताद जयंती**

क्रांतिकारकांचे गुरू लहुजी वस्ताद यांच्या नेतृत्वाखाली तरूण क्रांतिकारकांनी स्वतःच्या जिवाची बाजी लावून स्वतंत्रता आंदोलनात आहुती दिली. त्यांच्यामुळेच आज स्वातंत्र्याची फळे मिळत आहेत. या स्वातंत्र्याचे सुराज्य घडवायचे असेल तर क्रांतीगुरू लहुजींचा जाज्वल्य पराक्रम प्रेरणादायी आहे, असे उद्गार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मकरंद ढवळे यांनी काढले. क्रांतिगुरु लहुजी वस्ताद यांच्या जयंती निमित्त आयोजीत कार्यक्रमात ते आज पुण्यात बोलत होते.

**निओनेटल इनक्युबेटर**

नवजात बालक सप्ताह आणि जागतिक मुदतपूर्व जन्मदिवसाच्या निमित्तानं दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला रोटरी क्लबतर्फे दोन अत्याधुनिक निओनेटल इनक्युबेटर भेट देण्यात आले आहेत. या इनक्युबेटरमुळे मुदतपूर्व जन्मलेल्या बालकांना गर्भाशयासारखे सुरक्षित वातावरण मिळणार आहे. या कार्यक्रमाला पद्मविभूषण डॉ. विजय केळकर, रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. धनंजय केळकर, डॉ. राजन जोशी यांसह रोटरीचे पदाधिकारी उपस्थित होते.

या उपकरणांमुळे नवजात अतिदक्षता सेवांची गुणवत्ता आणखी उंचावली असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 30 तर किमान तापमान 12 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**